# वसई - विरार शहर महानगरपालिका

## सार्व. बांधकाम विभाग, मुख्यालय विरार (प.)

## सविस्तर ई-निविदा सूचना

वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खालील उल्लेखनीय कामांचे कोरे निविदा फॉर्म नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामांचे कोरे निविदा फॉर्म **दि.** १९/०५/२०२६ **ते दि.** २८/०५/२०२६ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होणार आहेत. प्राप्त निविदा दि. २९/०५/२०२६ रोजी शक्य झाल्यास दु. ३.०१ वा. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उघडण्यात येतील.

सदर कामाची निविदा पुर्व बैठक दि. २२/०५ /२०२६ रोजी दु. १२.३० वाजता मा. अति. आयुक्त (दक्षिण) यांचे दालनात, तिसरा मजला, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, विरार (प.) येथे घेण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.२७ मध्ये नवकार सिटी ते डॉन बॉस्को रोड वर दोन्ही बाजूस गटार बांधणे. | १६०६५१७३ | रू. १,५०,०००/- | कार्यादेश देण्यापुर्वी १% डी.डी. ने व उर्वरीत ३.५% रक्कम देयकातून | ११८०/- | १८० दिवस |
| २. | वॉर्ड क्र. २० मध्ये वालीव येथे पारशी बाबा घराजवळ नाला ते वालीव गाव स्मशानभूमी नाल्यापर्यत आर.सी.सी. गटार बांधणे. | १९७४१७१० | रू. १,५०,०००/- | कार्यादेश देण्यापुर्वी १% डी.डी. ने व उर्वरीत ३.५% रक्कम देयकातून | ११८०/- | १८० दिवस |
| ३. | वॉर्ड क्र. २० मध्ये मौजे राजावली येथे मुख्य रस्ता ते सार्वजनिक शौचालयापर्यंत आर.सी.सी. गटार बांधकाम व रस्ता कॉक्रीट करणे. | १५३६९८३६ | रू. १,५०,०००/- | कार्यादेश देण्यापुर्वी १% डी.डी. ने व उर्वरीत ३.५% रक्कम देयकातून | ११८०/- | २४० दिवस |
| ४. | वॉर्ड क्र. २० मध्ये शहरी बेघरांसाठी रात्र निवारा केंद्र नवीन इमारत बांधणे. | ३०१३५३७५ | रू. १,५०,६७७/- | कार्यादेश देण्यापुर्वी १% डी.डी. ने व उर्वरीत ३.५% रक्कम देयकातून | ११८०/- | ३६५ दिवस |

**अटी व शर्ती :-**

१) ई-निविदा फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची (प्रिपरेशन) अंतिम दि. २८ /०५/२०२६ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत राहील.

२) लिफाफा क्र. १ मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश असणे आवश्यक आहे.

अ) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र.

Scanned with OKEN Scanner

ब) आय.टी रिर्टन मागील तीन वर्षाचे.

क) बॅलेन्स शीट.

ड) प्रॉफीट ॲण्ड लॉस स्टेटमेंट

ई) GST नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

एफ) कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बीड कपॅसीटी) - (अे x एन x २) - बी
जेथे अे - गेल्या ५ वर्षांतील जास्तीत जास्त
वार्षिक उलाढाल (चालू दराने)
एन - देय कामाचा कालावधी
बी - हातातील कामांची किंमत
(देय कामांच्या कालावधीतील)

जी) ई.पी.एफ. रजिस्ट्रेशन

एच) ई. एस.आय. सी. रजिस्ट्रेशन

एल) रु. ५००/- स्टॅम्प पेपरवर सर्व कागदपत्र खरी असल्याबाबतचे शपथपत्र.

एम) हितसंबंध नसल्याबाबत तथा सामन्य वित्तीय नियम व केंद्रीय सतर्कता आयोग तसेच शासन निर्णय व निविदा सुचना या सर्व मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

एन) निविदा शुल्क भरल्याची पावती.

ओ) इसारा रक्कम भरणा केल्याची पावती.

पी) पावर ऑफ ॲटर्नी रजिस्टर्ड प्रत.

क्यू) बॅक गॅरेन्टी

आर) अनुभव प्रमाणपत्र - वर तक्त्यात नमुद केलेल्या कामाचे अ.क्र. १ ते ३ कामासाठी आर.सी.सी. गटार बांधल्याबाबतचे व अ.क्र.४ आर.सी.सी. बांधकाम खालील नमूद बाब - अ, ब व क नुसार काम पुर्ण केल्याचे किमान कार्यकारी अभियंता अथवा सक्षम दर्जाच्या अधिकाऱ्याचे स्वाक्षरी असलेले अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (मागील पाच वर्षात, कंत्राटदाराने त्याच स्वरुपाच्या तुल्यबळ किंमतीच्या, पुर्ण केलेल्या कामाची किमान किंमत)**देय कामांच्या किंमतीनुसार (प्रचलित दराने)**

**अ) तीन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी.**

**किंवा**

**ब) दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी.**

Scanned with OKEN Scanner

किंवा

**क) एक सारख्या पध्दतीची काम ज्याची किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी.**

एस) हाती असलेल्या व पूर्ण केलेल्या कामांची यादी.

टी) कंत्राटदार काळ्या यादीत समाविष्ट नसल्याचे प्रमाणपत्र.

यू) पॅनकार्ड /फॉर्म असल्यास फॉर्मचे पॅनकार्ड.

वी) कंत्राटदार डिफॉल्टर नाही हे समजण्यासाठी जी. एस.टी.-आर - ३ बी ची प्रत.

डब्लू) सनदी लेखापाल यांचे वार्षिक उलाढाल (टर्न ओव्हर) प्रमाणपत्र.

एक्स) जॉइंट व्हेंच्युअर असल्यास रजिस्टर्ड ॲग्रीमेंट.

वाय) तांत्रिक कर्मचारी यादी

४) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार सादर करण्याऱ्या निविदा धारकांनी लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाया L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे D.D./F.D.R./B.G. या स्वरुपात जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.

५) प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत "Additional Performance Security Deposit" चा भरणा केला नाही तर व्दितीय न्यूनतम देकाराच्या (L-२) निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल.

६) अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉमन्स सिक्युरीटी पुढील प्रमाणे देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम D.D./F.D.R./B.G. या स्वरुपात सादर करणे अनिवार्य राहील. (उदा. १९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ:करण १०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५% - १०% = ५%) तसेच (१९% - १५%) = ४% करीता (४% x २ % = ८%) असे एकूण (१% + ५% + ८% = १४%)

७) निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, इसारा अनामत रक्कम व सेवाशुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरावयाचे आहे. त्याची स्कॅन कॉपी लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावी अन्यथा त्या निविदाकाराचे टेक्नीकल/फायनांशिअल लिफाफा उघडले जाणार नाहीत. तसेच वरील नमुद सर्व शुल्क डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकींग, RTGS व NEFT मार्फत भरणा करता येईल.

Scanned with OKEN Scanner

८) सदर कामांकरीता संयुक्त उपक्रम व कोल्याबोरेशन स्विकारले जाणार नाही.

९) मुदतीत प्राप्त झालेल्या ई-निविदा शक्यतो त्याच दिवशी दु. ३.०१ वाजता अथवा दुसऱ्या दिवशी उपस्थित निविदाकार / त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

१०) कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा आलेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, वसई विरार शहर मनपा यांनी राखून ठेवला आहे.

११) निविदा प्रक्रियेचा तपशिल वरील संकेतस्थळावर (वेब साईटवर) उपलब्ध होईल.

१२) ई-निविदा प्रणाली बाबत काही शंका असल्यास त्याचे निरसन ०२०-२५३१५५५५ या हेल्पलाईनवर करून देण्यात येईल.

१३) इतर सविस्तर अटी-शर्ती ई-निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

१४) निविदा उघडताना मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करावीत.

जा.क्र. : वविशम/ बांध/श.अ/३२/२०२६
दिनांक : ०७/०५/२०२६

सही/-

(प्रदीप पाचंगे)
प्र. शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका

Signature Not Verified
Digitally signed by PRADEEP SURESH PACHANGE
Date: 2026.05.19 12:52:50 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner